**राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या आस्थापनेवरील प्रबंधक (विधि) या पदावर न्यायिक सेवेतील अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत..**

# महाराष्ट्र शासन

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**शासन आदेश क्रमांकः ग्रासंअ २०२६/प्र.क्र.९३/ग्रासं-४**

**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,**

**मंत्रालय, मुंबई ३२**

तारीख: ०८ ऑक्टोबर, २०२६

<u>वाचा:-</u>

१. ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९
२. शासन निर्णय क्रमांकः क्र. ग्रासंअ ०४२५/प्र.क्र.६० /ग्रा.सं-४, दि.१४.०५.२०२५
३. प्रबंधक (सामान्य) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे बदली आदेश दि. ०७.०९.२०२६
४. प्रबंधक (सामान्य) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे दिनांक ०४.०९.२०२६ रोजीचे पत्र.
५. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. राआ/महा/आस्था/नियुक्ती /प्रबंधक (विधि)/२०२६/५०४४, दि.०८.०९.२०२६.

<u>**शासन आदेश:-**</u>

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई येथील प्रबंधक (विधि) या पदावर न्यायिक सेवेतील श्रीम. नाझनिन मुनिर जमादार यांची उपरोक्त सदंर्भ क्र.२ येथील दिनांक १४.०५.२०२५ रोजीच्या शासन आदेशानुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती. उपरोक्त संदर्भ क्र. ३ येथील प्रबंधक (सामान्य) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ०७.०९.२०२६ रोजीच्या आदेशान्वये त्यांची बदली लघुवाद न्यायालय, मुंबई येथे करण्यात आली असून त्यांच्या जागी प्रबंधक (विधि) या पदावर न्यायिक सेवेतील श्री.बी.व्ही. बुरंडे यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याबाबत उपरोक्त संदर्भ क्र.४ येथील दिनांक ०४.०९.२०२६ रोजीच्या पत्रान्वये शिफारस केली आहे. सदर शिफारशीच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई येथील प्रबंधक (विधि) या पदावर न्यायिक सेवेतील श्री.बी.व्ही. बुरंडे यांची प्रतिनियुक्तीने नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्याची विनंती प्र. प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांनी संदर्भ क्र.५ येथील दिनांक ०८.०९.२०२६ रोजीच्या च्या पत्रान्वये केलेली आहे.

२. प्रबंधक (सामान्य) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांची शिफारस आणि ग्राहक संरक्षण अधिनियम, २०१९ मधील कलम ४६ (१) मधील तरतूदीस अनुसरुन खालील न्यायिक अधिकाऱ्याची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी प्रस्तुत शासन आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षे किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | न्यायिक अधिकाऱ्यांचे नाव व सध्याची पदस्थापना | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|
| १) | श्री.बी.व्ही. बुरंडे<br>न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई | प्रबंधक (विधि), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई |

३. उपरोक्त अधिकाऱ्याच्या वेतन-भत्त्याच्या प्रयोजनासाठी होणारा खर्च मागणी क्र.एम-२ मुख्य लेखाशिर्ष २४०८-अन्न साठवण व वखार साठवण, (०४) (००) ग्राहक संरक्षण अधिनियम, १९८६ अंतर्गत राज्य ग्राहक संरक्षण परिषद, राज्य आयोग आणि जिल्हा मंचाची स्थापना (०४) (०१) मुंबई शहर दत्तमत (२४०० ०२५१) (०१)- वेतन (०४) (०२) मुफसल दत्तमत (२४०० ०२६२) (०१)- वेतन या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा व तो मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१००८१७४३४५१३०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SUHAS BAJIRAO JADHWAR
Date: 2026.10.08 17:44:51 +05'30'

**(सुहास जाधवर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, यांचे खाजगी सचिव
३) मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
४) मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई.
५) सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) प्रधान सचिव, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा व परीक्षा), महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर
८) प्रबंधक, (प्रशासन) / (विधि), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई
९) श्री. बी.व्ही. बुरंडे, न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांना प्रबंधक, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचेमार्फत.
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
१३) निवडनस्ती ग्रासं-४.